दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ शनिवार, २३ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : ३६ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# १५ ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

महाराष्ट्र जीत

**मुंबई : राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**



रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री सरनाईक बोलत होते. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, सहआयुक्त रवी गायकवाड, संदेश चव्हाण, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. ना.कों. भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत.

रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रशिक्षणात सुमारे चार हजार शिक्षक सहभागी होणार असून, प्रत्येक महिन्यातील चार शनिवार आणि रविवार चालकांच्या सोयीप्रमाणे किमान चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. काही शिक्षक मानधनाशिवाय प्रशिक्षण देणार असून, काहींना प्रति तास एक हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तयारी :**
**सचित्र आणि सोप्या भाषेतील पाठ्यक्रम पुस्तिका.**
**प्रत्येक केंद्रांतर्गत उपकेंद्रे उभारली जाणार.**
**रिक्षा-टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडो वाहनांवर मराठी संदर्भातील जनजागृती स्टिकर्स लावले जाणार.**
**मराठी भाषा प्रचार-प्रसारासाठी विशेष बॅनर्स तयार करणार.**

**मानधनासाठी मराठी भाषा विभागाकडून दोन कोटी रुपयांची तरतूद**

मराठी भाषा प्रशिक्षणासाठी आवश्यक मानधनाच्या खर्चासाठी मंत्री सरनाईक यांच्या विनंतीनुसार मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पुढाकार घेतला आहे.

त्यासाठी दोन कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी दूरध्वनीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. उर्वरित खर्च परिवहन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

**प्रशिक्षणानंतर चालकांना प्रमाणपत्र**

रिक्षा-टॅक्सी चालकांनी या उपक्रमात सहभागी होऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यास त्यांना परिवहन विभागामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी चालकांची मराठी भाषेवरील व्यवहारिक क्षमता तपासण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांमध्ये तोंडी परीक्षा घेतली जाणार असल्याची माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांनी प्रशिक्षण केंद्रांची अंतिम यादी निश्चित करून ऑनलाईन आणि ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

रिक्षा-टॅक्सी चालकांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यांनी विनामूल्य उपलब्ध असलेले ऑनलाईन अथवा ऑफलाईन प्रशिक्षण घेऊन व्यावहारिक मराठी आत्मसात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

चालकांच्या वेळेनुसार प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाणार असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत मराठी भाषा शिकली नाही तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,

असा पुनरुच्चार मंत्री सरनाईक यांनी केला.

## महिलांसाठी आता जिल्हास्तरावर ‘पीसीओडी क्लिनिक’ सुरू
### महिलांच्या हार्मोनल व प्रजनन आरोग्य समस्यांवर विशेष उपचार सुविधा उपलब्ध

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी/** महिलांच्या हार्मोनल व प्रजनन आरोग्य समस्यांवर उपचार सुविधांसाठी जिल्हा स्तरावर “पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक” सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या पीसीओडी समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी हा नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाने यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

पीसीओडी ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून त्याचा परिणाम मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिक ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच महानगरपालिका रुग्णालयांमध्ये पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत. ही क्लिनिक दर बुधवारी ‘मेनोपॉज ओपीडी’ सोबत चालविण्यात येतील.

•या क्लिनिकमध्ये महिलांना खालील सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत :
•स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी
•आवश्यक वैद्यकीय तपासण्या
•एकात्मिक पद्धतीने उपचार
•आरोग्यविषयक समुपदेशन
•आहार व जीवनशैली संदर्भातील मार्गदर्शन

ज्या रुग्णालयांमध्ये नियमित स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसतील, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा घेण्यात येणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा तसेच आयईसी विभाग यांच्यामार्फत विशेष समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती, तपासणी, निदान व उपचार यांचा नियमित अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे महिलांमध्ये पीसीओडी संदर्भातील जागरूकता वाढण्यास मदत होणार असून वेळेत निदान व उपचार मिळाल्याने भविष्यातील गंभीर आरोग्य समस्या टाळण्यास मोठा हातभार लागणार आहे.

## उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूंचा गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत समावेश करा
### पी .आर .पी .चे तालुकाध्यक्ष सतिश पांडवे यांची कृषीमंत्री ना .दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/ संघपाल मदने :** राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतातील कामे करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असून शासनाच्या कृषी विभागाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष सतिश पांडवे यांनी देगलूरचे उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ही शेतकरी कुटुंबांना संकट काळात आर्थिक आधार देणारी महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजना आहे. मात्र या योजनेत उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने अनेक शेतकरी कुटुंबे मदतीपासून वंचित राहत आहेत.

सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट असून अनेक भागांमध्ये तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी हळद, कांदा, भुईमूग आदी पिकांची काढणी तसेच खरिप हंगामपूर्व मशागतीची कामे करत आहेत. कडक उन्हात दीर्घकाळ काम करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत असल्याने शासनाने तातडीने या गंभीर प्रश्नाची दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

उष्माघातामुळे होणाऱ्या शेतकरी मृत्यूंचा अपघात विमा योजनेत समावेश केल्यास मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळून मोठा दिलासा मिळेल, अशा आग्रही मागणीचे निवेदन नायब तहसीलदार विलास तेलंग यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे देगलूरच्या वतीने देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सतीश पांडवे, सूर्याजी पाटील जाधव, प्रा. निवृत्ती भागवत, किरण कांबळे, देवेंद्र कांबळे व गौतम वनंजे आदी उपस्थित होते.

## हभप .संजय कडोळे यांचे दुघोरा येथे व्याख्यान
### पुरुषोत्तम मासानिमित्त दुगोरा येथेअखंड हरीनाम सप्ताह



महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**

आपला समाज धार्मिक व आध्यात्मिक अशा वारकरी संप्रदायाद्वारे प्रेरित आहे. त्यामुळे सर्वांनी आपल्या नीती धर्माचे पालन करून मानवतेला जपावे. भविष्यातील काळ कठीण असून कसोटीचा आहे. अशावेळी एकमेकांशी परस्पर प्रेमाने रहावे ;वायफळ खर्च आणि दुर्व्यसने टाळून पैशाची बचत करावी. येथे उपस्थित प्रत्येक माय-माऊल्यांनो, आपल्या मुलांवर सुसंस्कार टाकून त्यांच्या हातून नवा भारत घडवा असे प्रतिपादन हभप. संजय महाराज कडोळे यांनी आपल्या व्याख्यानातून दूगोरा येथे दि२१ मे रोजी अखंड हरीनाम सप्ताहानिमीत्ताने आयोजीत कार्यक्रमातून केले.

वृत्त असे की, दुघोरा येथील विठ्ठल मंदिर संस्थानात पुरुषोत्तम मास निमित्त ‘एक नाम रात्रंदिन हरिनाम सप्ताह’ दि. १७ मे २०१८ पासून सुरूआहे .विठ्ठल मंदिर संस्थानचे सचिव श्रीकृष्ण पाटील नेमाने यांनी हभप. संजय महाराज कडोळे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सदस्य व नागा बाबा संस्थान मनभ्याचे विश्वस्त नंदकिशोर कव्हळकर, तसेच गुरुदेव सेवा मंडळाचे सेवाधारी हभप. लोमेश पाटील चौधरी यांचा सत्कार दि. २१ मे २०२६ रोजी केला . कार्यकमाला भावीकांची उपस्थीती होती .

## मागासवर्गीय महामंडळाचे कर्ज माफ करा - महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे



महाराष्ट्र जीत

**नाशिक (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली नाशिकचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. रोहितकुमार राजपूत साहेब यांची भेट घेऊन निवेदन दिले.निवेदनाचा विषय असा आहे की मागासवर्गीय तरुण तरुणींनी कोराना काळात व्यवसायासाठी महात्मा फुले महामंडळ आण्णाभाऊ साठे महामंडळ संत रविदास महामंडळ व अन्य महामंडळ मार्फत कर्ज घेतले होते परंतु कोरोना काळात व्यवसाय बुडाल्याने ते वेळेवर हप्ते भरू शकत नाही व जसे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले त्याच धर्तीवर मागासवर्गीय तरुण तरुणी चे कर्ज माफ करावे तसेच अनेक वर्षां पासून महात्मा फुले महामंडळ यांना सरकारने निधी न दिल्याने अनेक इच्छुक उमेदवारांचे प्रकरणे धूळ खात पडले असून राज्य सरकारने त्वरित मागासवर्गीय तरुणांना कर्जाचे वितरण करावे तसेच महात्मा फुले विकास महामंडळास पूर्ण वेळ अध्यक्षाची नेमणूक करावी..याप्रसंगी भिमटोला सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्ररत्न अनिलभाई गांगुर्डे, नाशिक जिल्हा उपाध्यक्ष रमेशजी साळवे, महानगर प्रमुख सुरेशजी जाधव, ज्येष्ठ नेते विष्णू गांगुर्डे,

## जैव विविधता जपण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे

महाराष्ट्र जीत

**कारंजा -**International Day for Biological Diversity अर्थात जागतिक जैव विविधता दिवस दरवर्षी २२ मे रोजी साजरा केला जातो. पृथ्वीवरील सर्व सजीवांचे अस्तित्व, त्यांचे परस्परांशी असलेले नाते आणि पर्यावरणाचा समतोल यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक, जलचर तसेच सूक्ष्म जीव या सर्वांचा समावेश जैव विविधतेमध्ये होतो.

मानवाच्या जीवनासाठी जैव विविधता अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला अन्न, औषधे, स्वच्छ हवा, पाणी, इंधन आणि नैसर्गिक संसाधने ही सर्व जैव विविधतेमुळेच मिळतात. जंगलातील वृक्ष पावसाचे संतुलन राखतात, पक्षी आणि कीटक परागीभवन करून शेतीला मदत करतात, तर अनेक औषधी वनस्पती मानवाला आरोग्यदायी जीवन देतात. त्यामुळे जैव विविधता ही केवळ निसर्गाची शोभा नसून मानवाच्या अस्तित्वाचा आधार आहे.




परंतु वाढते प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल, प्लास्टिकचा अतिवापर आणि नैसर्गिक अधिवासांचा नाश यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. ही परिस्थिती चिंताजनक आहे. जर जैव विविधतेचे संरक्षण केले नाही तर भविष्यात पर्यावरणाचा समतोल बिघडून मानवालाही गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते.

जैव विविधता जपण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. वृक्षारोपण करणे, पाणी वाचवणे, प्लास्टिकचा कमी वापर करणे, पक्षी व वन्यजीवांचे संरक्षण करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी याबाबत जनजागृती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

“निसर्ग वाचवा, जैव विविधता जपा” हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता प्रत्येकाच्या कृतीत उतरला पाहिजे. कारण जैव विविधता टिकली तरच पृथ्वीवरील जीवन सुंदर आणि सुरक्षित राहील.

## संपादकीय

### आकाश के तारे न देख!

'युद्धाने केली सुटका' या गुरुवारी (२१ मे) प्रकाशित झालेल्या संपादकीयात 'लोकसत्ता'ने आपल्या अर्थव्यवस्थेची घसरण इराण युद्ध सुरू होण्याआधीपासूनच कशी सुरू आहे हे दाखवून दिले. या युद्धाचे कारण पुढे करून स्वत:चे नाकर्तेपण दडवण्याच्या सरकारच्या प्रयत्नावर भाष्य करणे हा त्यामागील उद्देश. तो साध्य करताना अर्थव्यवस्थेची सद्य:स्थिती दाखवून देणे गरजेचे होते. परंतु त्यामागील कारणांचा पुरेसा वेध घेता आला नाही. तो प्रयत्न आजच्या संपादकीयात. सुरजित भल्ला यांच्यासारख्या ज्येष्ठ अर्थतज्ज्ञाचे लेखन हे यासाठीचे निमित्त. सदर लेख याच अंकात याच पानावर वाचता येईल. भल्ला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या संस्थेत संचालक होते. शिवाय ते काही अमर्त्य सेन वा कौशिक बसू वा रघुराम राजनही नव्हेत. हे तिघे सरकारचे आणि त्याहीपेक्षा त्यामागील विचारधारेचे कडवे विरोधक. भल्ला 'त्या' गटात कधीच नव्हते. ते दुसर्या गटाचे. सरकारचे सर्व काही कसे उत्तम सुरू आहे आणि आर्थिक आघाडीवर विवंचनेचे बिलकूल कारण नाही, असे जाहीरपणे मांडणारे आणि त्यासाठी आवश्यक सोयीस्कर संख्याशास्त्रीय कसरत करण्यास मागेपुढे न पाहणारे. परंतु आता त्यांच्याही सहनशक्तीचा बंध तुटला असावा. अलीकडे काही मुलाखतींत आणि नंतर सविस्तर लेखांत त्यांनी भारतीय अर्थव्यवस्था हाताळणार्यांवर कोरडे ओढले. अर्थव्यवस्थेच्या कुंठितावस्थेस पूर्णपणे सरकार जबाबदार असल्याचे ते म्हणतात. आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी 'लोकसत्ता' जी भूमिका सातत्याने मांडत आला, जे मुद्दे उपस्थित करत आला त्यास भल्ला यांच्या अभ्यासपूर्ण लेखाद्वारे पुष्टी मिळते. सबब त्याची दखल घेणे गरजेचे. त्यासाठी भल्ला यांनी मांडलेल्या मुद्द्यांची पुनरुक्ती करण्याची गरज नाही. ते त्यांच्या लेखात त्यांच्याच शब्दात वाचणे इष्ट. संपादकीयाचा प्रयत्न आहे तो त्यापुढे जाऊन हे असे का झाले असावे या कारणांचा शोध घेणे.

तसा तो घेतल्यास तथाकथित मध्यमवर्गास दोष देणे अपरिहार्य ठरते. हा मध्यमवर्ग २०१४ पूर्वी शेतकर्यांच्या खत अनुदानांत सरकारने वाढ केल्यावर चिडत असे. हा मध्यमवर्ग २०१४ पूर्वी विविध सरकारी कल्याणकारी योजनांवरील वाढत्या तरतुदीमुळे सरकारवर संतापत असे. हा मध्यमवर्ग २०१४ पूर्वी शेतकर्यांसाठी वीज बिल सवलती वा कर्जमाफी यासारख्या तरतुदींवर क्षुब्ध होत असे. हा मध्यमवर्ग २०१४ पूर्वी आर्थिक घोटाळ्यांवर उसळून उठत असे आणि सरसकट चलनवाढ आणि कथित आर्थिक घोटाळे यांतील नातेसंबंध गोड मानून घेत असे. पुढे २०१४ नंतर या मध्यमवर्गाने आपले निकष बदलले आणि ज्याविषयी आधी नाराजी, उद्विग्नता, असहायता व्यक्त केली ते सर्व मुद्दे त्याच मध्यमवर्गाने स्वीकारण्यास सुरुवात केली. राजीव गांधी यांच्या काळात केंद्रीय मंत्री जनार्दन पुजारी यांच्या बँक कर्ज मेळ्यांस नाके मुरडणार्या या मध्यमवर्गाने बिहार निवडणुकांआधी प्रत्येक बिहारी महिलेस १० हजार रुपयांची लाच गोड मानून घेतली आणि आपल्या पैशाने 'लाडक्या बहिणीं'स ओवाळण्या घातल्या जात आहेत याचीही लाज बाळगली नाही. तशी ती बाळगली असती आणि आपल्या नैतिकतेवर हा वर्ग ठाम राहिला असता तर राजकीय हेतूंसाठी या असल्या अर्थविचारांच्या अकल्याणकारी चोरवाटेचा 'राजपथ' झाला नसता. मध्यमवर्गाच्या या निवडक नैतिकतेमुळे पूर्वीचा 'राजपथ' आता राजकारणाचा 'कर्तव्यपथ' बनला असून आपण भरलेल्या करांतून होणारा हा राजकीय दौलतजादा पाहत हात चोळत बसण्यापलीकडे या मध्यमवर्गास काही पर्यायच उरलेला नाही. या मध्यमवर्गाने आपली सामूहिक विचारशक्ती इतकी गहाण टाकली की निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्येस (८० कोटी) वर्षानुवर्षे मोफत अन्नधान्य पुरवणारा आपला देश महासत्तापदी कधी तरी पोहोचू शकेल का, असा किमान बुद्धिमानांस पडणारा प्रश्नही त्यास पडेनासा झाला. हे सारे मुद्दे भल्ला यांनीही अन्यत्र मुलाखतींत मांडले आहेत. त्यामुळे अलीकडे हैदराबाद येथील सभेत पंतप्रधानांनी दिलेल्या काटकसरीच्या सल्ल्याचे ते स्वागत करतात.

# पेरणीतून उभी राहिली मानवी संस्कृती -प्रा. इंद्रजीत भालेराव

## 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६'मध्ये 'शोध – कृषी संस्कृतीचा' विषयावर व्याख्यान उत्साहात

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक :** वाशिम,माणसाने प्राण्यांची शिकार करून खाण्याऐवजी पेरून खाण्याची सुरुवात केली, तिथूनच खऱ्या अर्थाने मानवी संस्कृती आणि शेती संस्कृतीचा उदय झाला, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी, साहित्यिक व विचारवंत प्रा. इंद्रजीत भालेराव यांनी केले.




वाशिम जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी वृंदातर्फे आयोजित 'वाशिम वासंतिक व्याख्यानमाला २०२६' अंतर्गत दुसऱ्या पुष्पाचे व्याख्यान गुरुवारी दि. २२ मे रोजी उत्साहात पार पडले.

स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा), काटा चौफुली, वाशिम येथे आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री ना.चं.कांबळे, बाबाराव मुसळे यांच्यासह

अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाहा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) संजय रणवीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी एस ठोंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

'शोध – कृषी संस्कृतीचा' या विषयावर बोलताना प्रा. भालेराव यांनी प्राचीन लोकपरंपरा, वेदकालीन संस्कृती, रामायण-महाभारतकालीन कृषी व्यवस्था तसेच संत साहित्य आणि कृषीविषयक ग्रंथांच्या आधारे शेती संस्कृतीचा समृद्ध इतिहास उलगडून सांगितला.

व्याख्यानादरम्यान त्यांनी पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारांचा संदर्भ देत शेतीच्या प्रारंभाचा इतिहास स्पष्ट केला. त्रिशूलाचे तिफणीत झालेले रूपांतर, बसव्या बैलाची लोकपरंपरा आणि शेतीसाठी पशूंचा उपयोग याविषयी त्यांनी रंजक माहिती दिली. तसेच कॉ. शरद पाटील यांच्या 'वेदातील शेतीचा शोध' या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी 'तंत्र' म्हणजे शेती आणि 'वेद' म्हणजे ज्ञान यांचा संबंध अधोरेखित केला.

प्राचीन काळातील सामूहिक शेती, 'सीता' म्हणजे न नांगरलेली जमीन आणि 'उर्वरा' म्हणजे नांगरलेली जमीन या शेती प्रकारांची माहिती देतानाच 'वाफ धावण' या कृषीपरंपरेचाही त्यांनी उल्लेख केला. महाभारतकालीन कृषी व्यवस्थेचा संदर्भ देताना शेतकरी वर्गासाठी असलेली कर्जव्यवस्था, करपद्धती आणि शेतीचे विविध प्रकार यांचे विवेचन त्यांनी केले. देव मातृक, नदी मातृक आणि प्रकृती मातृक अशा शेतीच्या प्रकारांचेही त्यांनी सविस्तर वर्णन केले.

कृषी पराशर आणि कश्यप ऋषींच्या ग्रंथांतील संदर्भ देत त्यांनी जलव्यवस्थापन, संतुलित आहार आणि शेतीतील वैज्ञानिक दृष्टिकोन यावर प्रकाश टाकला. दक्षिण भारतातील संत तिरुवल्लुवर यांच्या 'कुराळ' या ग्रंथाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले, तर जगाला जगणे अवघड होईल, हा संदेश आजही अत्यंत समर्पक आहे. साने गुरुजी यांनी या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केल्याची माहितीही त्यांनी दिली.

पशुसंवर्धन, गोवंश व्यवस्थापन, बौद्धकालीन शेती, सम्राट अशोकाच्या काळातील सिंचन व्यवस्था आणि 'हलोत्सव' या कृषी उत्सवाबाबतही त्यांनी माहिती दिली. तसेच 'गाथासप्तशती', ज्ञानेश्वरी, संत एकनाथांचे भागवत आणि संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांमधून व्यक्त झालेल्या शेती संस्कृतीचे प्रभावी संदर्भ त्यांनी श्रोत्यांसमोर मांडले.

प्रा. भालेराव यांच्या अभ्यासपूर्ण, ओघवत्या आणि प्रभावी शैलीतील व्याख्यानाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, शेतकरी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १८ वर्षा पासून रुग्णांची सेवा करणाऱ्या महान येथील अनिता घुले यांना आरोग्य रत्न पुरस्काराने सन्मानित

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण सारकिन्ही :** सारकिन्ही बार्शीटाकळी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र महान येथील स्वास्थ अभ्यंगता अनिता घुले यांनी 18 वर्षापासून रुग्णांची सेवा करीत आहे आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा फ्लोरेस नाईटीनगल आरोग्य रत्न पुरस्काराने महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला र.नं. 38 81 यांच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

जागतिक परिचर्या दिनाचे औचित्य साधून अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागात ग्रामीण भागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका , स्वास्थ अभ्यंगता, विस्तार अधिकारी, यांचा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन जिल्हा प्रशिक्षण केंद्र अकोला येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये अनितताई घुले यांना पुरस्कार देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजपत्रित अधिकारी महासंघ राज्य अध्यक्ष बाळासाहेब घुगे, महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष संगीता जाधव, आरोग्य कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष पांडुरंग तेलगोटे, संघटनेचे सचिव संजय डाबेराव, मंचकावर उपस्थित होते, यावेळी अकोला जिल्ह्यात



प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि उपकेंद्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका, स्वास्थ अभ्यंगता, यांना सन्मानचिन्ह देऊन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, फ्लोरेन्स नाईटीनगल आरोग्य रत्न पुरस्काराने आरोग्य सेविका अनिता घुले ह्यांना सन्मानित करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र महान येथे अनिता घुले स्वस्त अभ्यंगता गेल्या एक वर्षापासून जोखमीच्या माता, जोखमीचे बालक, अर्भक मृत्युदर, बाल मृत्युदर,उबजत मृत्यूदर, माता मृत्यू दर कमी करण्यासाठी आरोग्य विभागात अहोरात्र आरोग्य सेवा देत आहे. निस्वार्थ इमानदारीने पोहोचून आरोग्यसेवा देत आहेत तसेच यांच्या केलेल्या निस्वार्थ आरोग्य सेवेची दखल महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना यांनी घेत यांना आरोग्य विभागातील सर्वउत्कृष्ट उच्च दर्जाचा जागतिक परिचारिका दिनानिमित्त फ्लोरेन्सनाईटिंगल आरोग् रत्न पुरस्कार प्रदान केला. त्यांचे जिल्हा भरात अभिनंदन करण्यात येत आहे.

## नाशिक येथील राज्यव्यापी महाअधिवेशनास जिल्ह्यातील सुवर्णकार समाज बांधवांनी उपस्थित राहावे – सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष अशोक रत्नपारखी यांचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड ! :** दैवज्ञ सुवर्णकार समाज धर्मशाळा ट्रस्ट श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर संस्था नाशिक व संगमेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल देशस्त दैवज्ञ सोनार समाज प्रांतिक मंडळ आयोजित ११ वे राज्यव्यापी महाअधिवेशन २३ व २४ मे रोजी नाशिक येथे होत आहे.



या अधिवेशनात जिल्ह्यातील समाज बांधवानी उपस्थित राहण्याचे आवाहन दैवज्ञ सोनार समाज अध्यक्ष अशोक रत्नपारखी यांचे वतीने करण्यात आले आहे. नाशिक येथील राष्ट्रसंत सदगुरु जनार्धन स्वामी आश्रम तपोवन नाशिक येथे हे अधिवेशन होणार आहे.या महाअधिवेशनास मार्गदर्शन करण्यासाठी गिरीश महाजन ग्रामविकासमंत्री, छगन भुजबळ जलसंपदा मंत्री, खासदार राजाभाऊ वाजे, शिवसेना संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर, महापौर हिमगौरी आडके,मा.खासदार हेमंत गोडसे उपमहापौर विलास शिंदे, मच्छिंद्र सानप सभापती, गजानन रत्नपारखी अध्यक्ष सोनार समाज दादर,फाटककर, काकासाहेब कुडाळकर ,अरुण बेलेकर,,दिनकर बायकेळीकर मोहन हिवरकर,, दिलीप महतकर, नंदु कुमार फाटककर, सुर्यकांत बेल्हेकर, रविंद्र बेल्हेकर, संजय मंडलिक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात शोभायात्रा, ग्रंथदिंडी, पालखी सोहळा, समाज गणना, पुस्तिका प्रकाशन, स्वतंत्र महिला सबलीकरण सत्र, विविध ज्ञाता संस्थासंघटन चर्चासत्र, विविध कला साहित्य विक्री स्टॉल, मार्गदर्शन स्टॉल तसेच महाराष्ट्रातील मान्यवरांचे ज्ञानवंत प्रबोधनात्मक व्याख्याने, स्मरणीका प्रकाशन, सांस्कृतीक कार्यक्रम, युवा, युवती स्वतंत्र ज्ञान प्रबोधन सत्र, विविध घोषणावह गुण-गौरव सोहळा सत्र, सर्वांसाठी खुले व्यासपीट चर्चासत्र आदी कार्यक्रम होणार आहे. तसेच ज्ञानदान, अन्नदान, रक्तदान, श्रमदान करण्याची सुवर्ण संधी मिळणार आहे.

या कार्यक्रमास विदर्भासह जिल्ह्यातील समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष अशोक रत्नपारखी व जिल्हा दैवज्ञ सोनार समाज बांधवाच्या वतीने करण्यात येत आहे.

## नाशिक मध्ये शनिवारी 23 मे रोजी विभागीय कलावंत/ साहित्यिक यांची बैठक

महाराष्ट्र जीत

**नाशिक (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे :** राज्यव्यापी कलावंतांची एकमेव पोलादी संघटना असलेल्या अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समिती या कलावंत संघटनेच्या वतीने येत्या शनिवार दिनांक २३ मे २०२६ रोजी वेळ दुपारी १ वाजता हुतात्मा स्मारक जिल्हाधिकारी कार्यालय समोर सीबीएस नाशिक या ठिकाणी अ. नगर / धुळे / जळगाव आणि नाशिक जिल्ह्यातील कलावंत/ साहित्यिक / वारकरी (भजनी मंडळ) यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली असल्याचे माहितीपत्रक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध गायक सोमनाथ गायकवाड यांनी प्रसिद्ध दिले आहे.सदर बैठकीमध्ये वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे प्रामुख्याने 1)कलावंतांची नाशिक जिल्हा कार्यकारणी स्थापन करणे 2) संगमनेर या ठिकाणी विभागीय कलावंतांचा महाक्रांती मेळाव्याचे आयोजन करणे 3) नाशिक विभागातील कलावंतांचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित पडले आहेत त्या प्रश्नांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भव्य धरणे आंदोलनाची तयारी करणे... अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवरती या बैठकीमध्ये प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे. तरी धुळे/ जळगाव / नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील कलावंतांनी व साहित्यिकांनी या बैठकीस आवर्जून उपस्थित रहावे असे जाहीर आवाहन अखिल भारतीय कलावंत न्याय हक्क समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## हप्ता न मिळाल्यामुळे लाडक्या बहिणींमध्ये नाराजीचा सूर; मार्च एप्रिल महिन्याचा हफ्ता मिळाला नाही

महाराष्ट्र जीत

**रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक :** रिसोड तालुक्यातील बऱ्याचशा लाडक्या बहिणींना मार्च एप्रिल महिन्याच्या हप्त्याचा लाभ भेटला नाही आम्ही केवायशी सुद्धा केली आहे तरीसुद्धा आम्हाला पैसे आले नाहीत असे लाडक्या बहिणीचे म्हणणे आहे हफ्ता न मिळाल्यामुळे लाडक्या बहिणीमध्ये नाराजी दिसत आहे आम्हाला आमचा मार्च एप्रिल महिन्याचा हप्ता मिळावा व केवायसी करण्याची तारीख वाढवून द्यावी अशी तीव्र मागणी लाडक्या बहिणी करत आहेत.

# काजळेश्वरचे तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष पाटील उपाध्ये यांचे जन्मदिनी चाहत्यांनी केले त्यांचे अभिनंदन


महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:** कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथील महात्मा गांधी तंटामुक्त समीतीचे अध्यक्ष सुभाष पाटील वासुदेवराव उपाध्ये यांचे त्यांचे जन्म दिनी दि २२ मे रोजी गावचे सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांचे सह मित्रमंडळ तथा चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत .





वृत्त असे की सुभाष पाटील उपाध्ये यांचे कुटूंबीयांना त्यांचे वडील वासुदेवराव पाटील उपाध्ये यांचे कारकीर्दीपासूनच राजकारण समाजकारणाचे वलय आहे . त्यांचे वडील काजळेश्वरचे २० वर्ष सरपंच तथा कारंजा पंचायत समीतीचे उपसभापती होते . सुभाष पाटील उपाध्ये यांच्या पत्नी सौ शिलाताई ह्यानी गावचे सरपंच पद तथा कारंजा पंचायत समीतीचे सभापती पद भुषविले होते स्वता सुभाष पाटील हे ग्रामपंचायतचे



सदस्य राहलेले असून सामाजीक कार्यात अग्रेसर असल्याने राजकारणात त्यांची पकड आहे . गावचे तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून ते सद्या कार्य करीत असून गावात त्यांच्या शब्दाला वजन आहे . त्यांचा अभीष्टचिंतन सोहळा सरपंच नितीन पाटील उपाध्ये यांचे पुढाकारात नितीन पाटील; सुभाष पाटील मित्रमंडळ तथा त्यांच्या चाहत्यांनी त्यांचे सपत्नीक औक्षवण करून पेढे ऐकमेकांना भरवत साजरा केला . याप्रसंगी त्यांना प्रेमी जनांनी उपस्थित राहून निरोगी दिर्घायुष्या साठी शुभेच्छा दिल्यात .

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## फसवणुकी प्रकरणी गुन्हा दाखल

महाराष्ट्र जीत

**नवीन पनवेल प्रतिनिधी :**बोगस व्यक्ति खरे मालक असल्याचे भासवून बोगस खरेदी विक्री करार पत्र बनवल्या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात 20 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी मोहम्मद नदीम हिदाईतुल्ला खान आणि त्यांचा भाऊ जमान खान यांच्या मालकीची तुर्भे (पनवेल) येथे तीस गुंठे जमीन आहे. मोहम्मद आणि त्यांचा भाऊ जमान यांच्या नावाने बोगस व्यक्ती उभ्या करून आणि त्यांचे खोटे आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्र बनवून ती खरी असल्याप्रमाणे वापरली आणि बोगस व्यक्ति खरे असल्याचे भासवले तसेच बोगस खरेदी विक्री करारपत्र




बनवून जमीन विलास भगवान पाटील, विकी मनोहर लदगे यांना विकली. याप्रकरणी विलास पाटील, विकी लदगे आणि खरेदी खतावरील साक्षीदार गणेश अनंता शेळके, कैलास बाळू विरळे आणि अनोळखी दोन व्यक्ती व इतर यांनी फिर्यादी यांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## पत्नीने गुप्तांगावर केले चाकूने वार

महाराष्ट्र जीत

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पत्नीने पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार करून त्याला जखमी केले आणि सासूच्या तोंडावर गरम पाणी ओतून त्यांना देखील जखमी केले आणि ती घरातून चाकूसह पळून गेली. या प्रकरणी पत्नी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 20 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पती हे रिक्षा चालक असून ते त्यांच्या घराच्या बेडरूम मध्ये झोपले असताना त्यांच्या पत्नीने मागील भांडणाचा राग मनात धरून पतीच्या गुप्तांगावर चाकूने वार केले तसेच सासूच्या तोंडावर गरम पाणी ओतून ओतले. यात पती



आणि सासू दोघेही जखमी झाले आहेत. त्यानंतर पत्नी चाकूसह घरातून पळून गेली. दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## संपत्ती स्थानिकांची, तुंबड्या भरल्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी जागे व्हा

### लाचखोर मंडल अधिकारी प्रकरणातील तक्रारदार निलेश पाटील यांचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल शहरातील पर्डी क्रमांक 74 अ या 4.22 गुंठे जमिन मालकाचे नाव सातबाऱ्यावर चढविण्यासाठी तब्बल 1 लाख रूपयांची लाच मागणारा गजाआड झाला. पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या तक्रारीमुळे लाचखोरीचा भस्म्या झालेला मंडल अधिकारी गोवर्धन माने 30 हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडला. परंतू केवळ महसूल विभागात हा भ्रष्टाचार नाही तर पनवेल तालुक्यातील सर्वच शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटलेली आहे. महानगरपालिका, सिडको, अप्पर तहसिलदार, पनवेल भूमिअभिलेख, प्रांत, सब रजिस्टार ऑफिस आदी कार्यालये भ्रष्टाचाराने पोखरलेली आहेत. पनवेल तालुक्यातील बापजाद्यांच्या कमाईतून मिळवलेल्या जमिनीवर सरकारी अधिकाऱ्यांचा डोळा असून शेकडो अधिकाऱ्यांनी सोन्याच्या तुंबड्या भरल्या आहेत. काम फुकट करण्याची जबाबदारी असलेले अधिकारी प्रत्येक काम पैसे घेतल्याशिवाय काम करीत नाहीत असा आरोप निलेश पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. आमच्या हक्काच्या कामासाठी पैसे का द्यायचे असा प्रश्न विचारल्याशिवाय गोरगरीब शेतकऱ्यांची कामे होणार नाहीत. पैशासाठी कोणाचे काम अडविले जाणार असेल तर माझ्याशी संपर्क साधा मी न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेन आवाहन निलेश पाटील यांनी केले.

सातबारावर नाव नोंदविण्यासाठी निलेश पाटील यांनी पनवेलच्या तहसिलदार मिनल भामरे यांनी नोव्हेंबर 2025 रोजी अर्ज केला होता. डिसेंबर किंवा जानेवारीत हे काम पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतू संबंधित जागेची किंमत कोट्यवधी रूपये आहे, त्यामुळे याकामासाठी 1 लाख रूपये लागतील अशी मागणी केली. माझी प्रॉपर्टी किती कोटींची आहे, यांच्याशी मंडल अधिकारी गोवर्धन माने यांचा काय संबंध असा प्रश्न उपस्थित करून पैसे देण्यास निलेश पाटील यांनी नकार दिला. पैसे देण्यास नकार दिल्यामुळे माने याने थम्ब इंप्रेशनचे काम जाणिवपुर्वक रखडविले. अखेर तडजोडीअंती सुरूवातीला 50 हजार आणि 30 हजारात माने काम करण्यास तयार झाला. त्यामुळे रायगड लाचलुचपत विभागाने लावलेल्या सापळयात माने अडकला. सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक करण्याचा हा प्रकार पनवेलमध्ये नवीन नाही. पनवेल तालुका म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांसाठी अक्षरश सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. पनवेलमध्ये पोस्टिंग मिळवण्यासाठी कोट्यवधींची गुंतवणूक म्हणजेच वरिष्ठ कार्यालयाला पैसे द्यायचे, आणि पोस्टींगसाठी गुंतवलेली रक्कम दामदुप्पटपणे वसूल करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांची कामे अडवून भ्रष्टाचाराच्या मार्गाने वसूल करायची. यासाठी स्थानिक जमिनदार, वारसदारांची पिळवणूक सुरू आहे. यामुळे पनवेलमधील जमीनमालक हतबल झाला आहे. अनेक गरीब शेतकऱ्यांची कामे लाच देण्यासाठी पैसे नसल्यामुळे अडकलेली आहेत. विकासकामांच्या नावाखाली कमिशनखोरी, परवानग्यांसाठी दलाली, फाईल हलवण्यासाठी पैशांची मागणी आणि कंत्राटांमधील गैरव्यवहार यामुळे प्रशासनावरील विश्वास ढासळत चालला आहे. झपाट्याने वाढणाऱ्या विकासाचा फायदा स्थानिकांना मिळण्याऐवजी भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांना होतो आहे. सामान्य नागरिक मात्र कर भरून, सरकारी शुल्क भरून आणि हेलपाटे मारून थकला आहे.

पनवेलमधील एकही सरकारी कार्यालय याला अपवाद नाही. उलट इतर तालुक्यांपेक्षा पनवेल, उरण आणि आसपासच्या तालुक्यातील विकासामुळे लाचेचा दर देखील चढा आहे. याला आळा घालायचा असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी जागे होण्याची गरज आहे.

पैसे मागणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आवाज उठवून संबंधितांना धडा शिकवल्याशिवाय हे थांबणार नाही. मी पनवेलचे आमदार प्रशांतदादा ठाकूर आणि आमदार विक्रांतदादा पाटील यांची भेट घेवून याबाबत ठोस पावले उचलण्याची मागणी करणार असल्याचे निलेश पाटील यांनी सांगितले. नागरिकांना सरकारी कार्यालयातील कामकाजात काही अडथळे आल्यास माझ्याशी 9867779777 या मोबाईलवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

## मराठवाडा : दुष्काळ, टँकर आणि उद्ध्वस्त शेतकरी

महाराष्ट्र जीत

'मराठवाडा' महाराष्ट्राच्या नकाशावरचा एक मोठा प्रदेश , पण विकासाच्या प्रवाहात कायम उपेक्षित राहिलेला. संतांची भूमी, कष्टकरी माणसांची भूमी आणि संघर्षाची भूमी म्हणून ओळख असलेल्या या प्रदेशासमोर आज पाणीटंचाई, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि शेतकरी आत्महत्यांचे अभूतपूर्व संकट उभे आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा तर दुसरीकडे सरकारी उदासीनता, अपूर्ण सिंचन प्रकल्प आणि तुटपुंज्या मदतीच्या योजना यामुळे ग्रामीण जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हजारो कोटींच्या घोषणा झाल्या, नदीजोड प्रकल्पांचे भूमिपूजन झाले, दुष्काळमुक्त मराठवाड्याची स्वप्ने दाखवली गेली; पण आजही अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर आणि शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू हेच वास्तव दिसते.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये वारंवार दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होत असते. राज्य शासनाच्या विविध अहवालांनुसार मराठवाड्यातील सिंचनक्षमता राज्याच्या सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. काही भागांमध्ये ती १५ ते १८ टक्क्यांच्या आसपास असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे येथील बहुतांश शेती अजूनही पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर झाला तरच शेतकऱ्याच्या घरात दिवा लागतो; अन्यथा खरीप हातचा जातो, रब्बीची आशा संपते आणि कर्जाचा डोंगर वाढतो.

या संपूर्ण संकटामध्ये बीड जिल्ह्याची परिस्थिती सर्वाधिक गंभीर मानली जाते. राज्यातील सर्वाधिक दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये बीडचा वारंवार उल्लेख होतो. अनियमित पाऊस, अत्यल्प सिंचनक्षमता आणि भूजल पातळीतील मोठी घट यामुळे जिल्ह्यातील शेती पूर्णपणे अस्थिर बनली आहे. जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, अंबाजोगाई, परळी, धारूर, केज, पाटोदा आणि शिरूर कासार हे तालुके दरवर्षी तीव्र जलटंचाईचा सामना करत आहेत. अनेक गावांमध्ये उन्हाळ्यात विहिरी आणि बोअरवेल पूर्णपणे कोरड्या पडतात.

दुष्काळी परिस्थितीची भीषणता टँकरच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. २०१६ च्या तीव्र दुष्काळात मराठवाड्यात हजारो गावे टँकरवर अवलंबून होती. काही काळात संपूर्ण मराठवाड्यात ४,००० ते ६,००० पेक्षा अधिक टँकर सुरू



असल्याची सरकारी नोंद होती. बीड जिल्ह्यात शेकडो गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. काही गावांमध्ये आठवड्यातून एकदाच पाणी मिळत होते. महिलांना आणि लहान मुलींना मैलोनमैल पायपीट करून पाणी आणावे लागत होते. पाण्यासाठी वाद, भांडणे आणि संघर्षाची परिस्थिती अनेक भागांत निर्माण झाली होती.बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांची आकडेवारीही अत्यंत धक्कादायक आहे. अधिकृत सरकारी नोंदींनुसार मागील काही महिन्यांतच जिल्ह्यात २०० पेक्षा अधिक शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली होती. संपूर्ण मराठवाड्यात दरवर्षी शेकडो शेतकरी आत्महत्या करतात. बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि जालना हे जिल्हे सातत्याने आत्महत्यांच्या यादीत वर राहिले आहेत. पिकांचे नुकसान, हमीभावाचा अभाव, वाढलेले उत्पादन खर्च, बँकांचे आणि खासगी सावकारांचे कर्ज, पीकविम्याचा विलंब आणि पाण्याची असुरक्षितता या सर्वांनी शेतकरी मानसिकदृष्ट्या खचला आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मागे उद्ध्वस्त कुटुंबे, अनाथ झालेली मुले आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या विधवा स्त्रिया उभ्या आहेत.

बीड जिल्ह्यातील आणखी एक गंभीर वास्तव म्हणजे ऊसतोड मजुरांचे स्थलांतर. दरवर्षी लाखो मजूर मराठवाड्यातून पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटकात ऊसतोडीसाठी स्थलांतरित होतात. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा वाटा मोठा आहे. अनेक कुटुंबे सहा-सहा महिने गावापासून दूर राहतात. लहान मुलांचे शिक्षण अर्धवट राहते, महिलांना असुरक्षित परिस्थितीत काम करावे लागते आणि अनेक कुटुंबांचे सामाजिक आयुष्य विस्कळीत होते. दुष्काळ आणि बेरोजगारीमुळे स्थलांतर हा अनेकांसाठी जगण्याचा पर्याय बनला आहे.

दुष्काळामुळे चारा टंचाईचे संकटही वारंवार निर्माण होते. २०१६ च्या तीव्र दुष्काळात मराठवाड्यात शेकडो चारा छावण्या सुरू करण्यात आल्या होत्या. हजारो जनावरे त्या छावण्यांमध्ये ठेवण्यात आली. बीड जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर छावण्या उभाराव्या लागल्या. अनेक शेतकरी स्वतः उपाशी राहिले, पण जनावरे वाचवण्यासाठी संघर्ष करत राहिले. मात्र अनेकदा छावण्यांना निधी उशिरा मिळणे, अपुऱ्या सुविधा आणि व्यवस्थापनातील त्रुटी याबाबत तक्रारी समोर आल्या.

या संकटातून मार्ग काढण्यासाठी गोदावरी–सिंदफना, वैनगंगा–पैनगंगा, नार-पार–गोदावरी, दमणगंगा–गोदावरी अशा नदीजोड योजनांची घोषणा करण्यात आली. मराठवाड्यासाठी अंदाजे १६८ TMC पर्यंत अतिरिक्त पाणी उपलब्ध होऊ शकते, असा दावा विविध समित्या आणि अभ्यासकांनी केला. बीड जिल्ह्यासाठी विशेषतः गोदावरी–सिंदफना प्रकल्प महत्त्वाचा मानला जातो. या योजनांमुळे लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल, भूजल पातळी वाढेल आणि टँकरमुक्त गावे तयार होतील, असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात अनेक योजना अजूनही फाईलमध्येच अडकलेल्या दिसतात.

सरकारी घोषणांचा गाजावाजा मोठा असतो; पण प्रत्यक्ष मदत अत्यंत तुटपुंजी असते, अशी भावना ग्रामीण भागात तीव्र आहे. कर्जमाफीच्या घोषणा होतात; पण अनेक शेतकरी पात्र असूनही वंचित राहतात. नुकसानभरपाई जाहीर होते; पण मिळणारी रक्कम उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असते. काही हजार रुपयांच्या मदतीने लाखोंचे नुकसान भरून निघत नाही. पीकविमा योजनांमध्येही अनेक तक्रारी समोर आल्या. नुकसान झाले तरी विमा वेळेवर मिळत नाही, पंचनामे उशिरा होतात आणि शेतकरी पुन्हा कर्जाच्या गर्तेत अडकतो. ग्रामीण बेरोजगारी ही आणखी एक गंभीर समस्या बनली आहे. लाखो युवक शिक्षण पूर्ण करून गावात परततात; पण रोजगार उपलब्ध नसतो. उद्योगधंदे नाहीत, प्रक्रिया उद्योग नाहीत आणि शेतीतही स्थैर्य नाही. परिणामी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर वाढले आहे. अनेक युवक शहरांकडे मजुरीसाठी जात आहेत. याचाच परिणाम शेतकरी तरुणांच्या विवाहांवरही होत आहे. आज अनेक गावांमध्ये शेती करणाऱ्या मुलांचे लग्न जुळणे कठीण झाले आहे. दुष्काळ, कर्ज आणि अस्थिर भविष्य पाहून अनेक कुटुंबे शेतकरी मुलांना नकार देतात.

आज मराठवाड्याची परिस्थिती ही केवळ नैसर्गिक संकटाची कहाणी नाही; तर ती व्यवस्थात्मक अपयशाची जिवंत साक्ष आहे. शेतकरी आत्महत्या, हजारो टँकर, चारा छावण्या, बेरोजगार तरुण, लग्नासाठी नकार मिळणारे शेतकरी तरुण आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली कुटुंबे हे सर्व चित्र महाराष्ट्राच्या विकास मॉडेलवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते. जर खरंच मराठवाडा बदलायचा असेल, तर घोषणांपेक्षा कृतीला प्राधान्य द्यावे लागेल. नदीजोड प्रकल्प, शाश्वत सिंचन, ग्रामीण उद्योग, रोजगारनिर्मिती, पारदर्शक मदत व्यवस्था आणि शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवणारे धोरण याशिवाय पर्याय नाही. अन्यथा प्रत्येक वर्षी नवे आश्वासन मिळेल, नवी घोषणा होईल; पण मराठवाड्याच्या डोळ्यातील पाण्याची प्रतीक्षा कायम राहील.

**- भरत पवार**

## कॅन्सरचा धोका कमी करण्यात 'व्हिटॅमिन सी' ठरतंय प्रभावी? नवीन संशोधन काय सांगतं?


आंबट गोड चवीची आणि पिवळया केशरी रंगाची संत्री सगळ्यांच्याच आवडीची असतात. सर्दी झाल्यावर संत्री खाल्ल्याने आरोग्यात झपाट्याने सुधारणा होते, असा अनेकांचा समज आहे. मात्र, याच संत्रीचा संबंध आता थेट कर्करोगावरील प्रभावी उपचारासाठी जोडण्यात आला आहे. कॅनडातील वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी केलेल्या एका नव्या अभ्यासात संत्र्यांमध्ये आढळणारे ‘व्हिटॅमिन सी’ पचनसंस्थेशी संबंधित कर्करोगाचा धोका कसा कमी करू शकते, याचे विश्लेषण करण्यात आले आहे. या संशोधनाचे निष्कर्ष ‘जर्नल ऑफ थिअरेटिकल बायोलॉजी’ या नियतकालिकात प्रकाशित करण्यात आले आहेत, त्याविषयी…

**कर्करोगग्रस्त रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ**

बदलती जीवनशैली आणि चुकीच्या सवयींमुळे कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. दरवर्षी जगभरात एक कोटीहून अधिक लोकांचा कर्करोगाने मृत्यू होत असल्याची बाब उघड झाली आहे. भारतातही या जीवघेण्या आजाराचे प्रमाण वाढत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. २०२५ च्या अखेरीस प्रत्येकी पाचपैकी एका पुरुषाला आणि सहापैकी एका महिलेला कर्करोगाची लागण होणार असल्याचा अंदाज ‘इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर’ या संस्थेने वर्तवला होता. त्यांचा हा अंदाज खरा ठरला असून, कित्येकांना कर्करोगाची लागण झाल्याचे समोर आले आहे. भारतात दर दोन मिनिटांना तीन लोकांचा कर्करोगाने मृत्यू होत असल्याची धक्कादायक बाब आकडेवारीतून समोर आली आहे. भविष्यात हा आकडा आणखीनच वाढणार असल्याची भीती काही अहवालांमधून व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे या जीवघेण्या आजारावर प्रभावी उपचारासाठी अनेक देशांत संशोधन सुरू आहे.

**‘व्हिटॅमिन सी’ म्हणजे काय?**

‘व्हिटॅमिन सी’ हे पाण्यात विरघळणारे जीवनसत्त्व असून ते शरीराच्या एकंदरीत आरोग्यासाठी आणि कार्यक्षमतेसाठी अत्यंत महत्वाचे मानले जाते. हे सूक्ष्म पोषक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास, संसर्गाशी लढण्यास आणि त्वचा, रक्तवाहिन्या, हाडे निरोगी ठेवण्यास मदत करते. मानवी शरीरात ‘व्हिटॅमिन सी’ आपोआप तयार होत नाही आणि



ते साठवूनही ठेवता येत नाही. त्यामुळे संत्री, मोसंबी यांसारखी फळे आणि बेरी, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या किंवा पूरक आहारातून ते मिळवावे लागते. यादरम्यान वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी एका गणितीय तंत्राचा वापर करून ‘व्हिटॅमिन सी’ पचनसंस्थेतील कर्करोगाला कारणीभूत ठरणाऱ्या रासायनिक प्रक्रियांवर कसा प्रभाव पाडते, याचा सखोल अभ्यास केला आहे.

**कॅन्सरचा धोका कसा कमी होऊ शकतो?**

गेल्या काही दशकांत उत्तर अमेरिकेतील नागरिकांच्या शरीरात प्रक्रिया केलेल्या अन्नातील नायट्रेट्स आणि नायट्राइट्सचे प्रमाण वाढले आहे. हे घटक प्रक्रिया केलेल्या मांसासह प्रदूषित माती आणि पाण्यात पिकवलेल्या फळे व भाज्यांमध्ये आढळून येतात. वास्तविक पाहता नायट्रेट्स आणि नायट्राइट्स हे मज्जासंस्था आणि हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असले तरी पोटामध्ये त्यांच्यावर ‘नायट्रोसेशन’ नावाची रासायनिक प्रक्रिया होते. या प्रक्रियेत तयार होणारी काही संयुगे कर्करोगाचा धोका वाढवू शकतात, असा अनेक वैज्ञानिकांचा संशय आहे. “१९९० च्या दशकापासून अनेक संशोकांकडून या संयुगांचा आणि कर्करोगाचा संबंध तपासला जात आहे. मात्र, त्याचे निष्कर्ष नेहमीच परस्परविरोधी आले आहेत. आमच्या संशोधनानुसार, आहारातील ‘व्हिटॅमिन सी’च्या उपस्थितीमुळे या निकालांमधील विसंगती स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते,” असे या संशोधनाचे प्रमुख डॉ. गॉर्डन मॅकनिकोल यांनी सांगितले.

**संशोधकांनी कसे लावले निष्कर्ष?**

या संबंधाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी लाळग्रंथी, पोट, लहान आतडे आणि रक्तातील प्लाझ्मा यांचे गणितीय मॉडेल तयार केले. त्यानंतर नायट्राइट्स आणि नायट्रेट्स शरीरात कसे फिरतात आणि कालांतराने त्यांच्यात कसे बदल होतात, यावर संशोधन करण्यात आले. अभ्यासादरम्यान असे आढळले की, पालकसारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये ‘व्हिटॅमिन सी’ आणि ‘नायट्रेट’ दोन्ही असतात. अशा भाज्यांच्या सेवनाने कर्करोगाचा धोका झपाट्याने कमी होऊ शकतो. या संशोधनात असेही दिसून आले की- प्रत्येक जेवणानंतर व्हिटॅमिन सी सप्लिमेंट घेतल्यास नायट्रोसेशनमधून तयार होणाऱ्या आणि कर्करोगाच्या धोक्याशी संबंधित संयुगांची निर्मिती काही प्रमाणात कमी होऊ शकते.

विशेषतः बेकन आणि सलामीसारख्या पदार्थांमधील नायट्राइट्स व नायट्रेट्समुळे निर्माण होणारा धोका कमी करण्यास त्याचा फायदा मोठा होऊ शकतो.

**भविष्यातील संशोधनासाठी होणार मदत**

“वॉटरलू विद्यापीठातील संशोधकांनी केलेले हे संशोधन भविष्यातील क्लिनिकल आणि प्रयोगशाळेतील अभ्यासांसाठी एक वैज्ञानिक मार्गदर्शक ठरू शकते.

याद्वारे नायट्राइटचे शरीरातील प्रमाण, अँटी-ऑक्सिडंट्सचे सेवन, जेवणाची वेळ, पोटातील आरोग्यविषयक स्थिती आणि तोंडातील सूक्ष्मजीवांची सक्रियता, अशा संभाव्य घातक रासायनिक प्रक्रियांना कारणीभूत ठरणाऱ्या महत्त्वाच्या घटकांची ओळख पटवण्यात आली आहे.

भविष्यात हा अभ्यास संशोधकांना अधिक अचूक प्रयोग आणि उपाययोजना आखण्यास मदत करेल; तसेच नायट्रोसेशनची प्रक्रिया नेमकीकधी आणि कोणामध्ये होण्याची शक्यता सर्वाधिक आहे, यावर लक्ष केंद्रित करणे यामुळे सोपे होईल, अशी माहिती या अभ्यासाच्या सह-लेखिका डॉ. अनिता लेटन यांनी दिली आहे.

महाराष्ट्र जीत

# अन्नसुरक्षेसाठी अनुवांशिक अडथळे तोडण्याकरिता, संकरित गव्हासाठी हरितक्रांती!

महाराष्ट्र जीत

स्वातंत्र्यानंतर, भारताला अन्नधान्याची तीव्र टंचाई भेडसावत असताना प्रमुखत: धान्य आयातीवर अवलंबून राहावं लागत होतं. तसेच PL४८० सारख्या योजनांतर्गत विशेष व्यवस्थेद्वारे, देशानं आपल्या वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरविण्यासाठी संघर्ष केला. एम. एस. स्वामीनाथन आणि नॉर्मन बोरलॉग यांसारख्या शास्त्रज्ञांच्या नेतृत्वानं हरित क्रांतीदरम्यान गव्हाच्या उच्च-उत्पादक वाण आणून आमूलाग्र बदल घडवून आणला.









सुधारित गव्हाचे अनुवांशिकता, सिंचन विस्तार, खते आणि शेतीच्या चांगल्या पद्धती यांचा मिश्र करण्यात आलं. भारतानं अन्नधान्याची कमतरतेवर मात करत गव्हाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण देश म्हणून ओळख निर्माण केली.

पिकाचं उत्पादन हे देशाचं नशीब बदलू शकते, हे हरितक्रांतीनं दाखवून दिलं. गव्हाचे उत्पादन खूप वाढल्यानं लाखो लोकांना अन्नसुरक्षा मिळाली. मात्र, आज जगासमोर एक नवीन आव्हान आहे. जागतिक लोकसंख्या सतत वाढत आहे. हवामानातील बदलामुळे अंदाज करणं अशक्य होईल, अशी हवामानाची स्थिती निर्माण होत आहे. शहरीकरण आणि पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे शेतजमीन कमी होत आहे. शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थिती असताना कमी जमिनीतून जास्त अन्न उत्पादन केले पाहिजे.

जीनोमिक्स, अचूक पीक उत्पादन आणि नवीन संकरित प्रणालींसह आधुनिक कृषी जैवतंत्रज्ञान हे जागतिक अन्न मागणी पूर्ण करण्यासाठी भविष्यासाठी प्रमुख साधन म्हणून उदयास आलं. संकरित गव्हाचा विकास हे सर्वात मोठे वैज्ञानिक आव्हान आहे. त्याबाबत संशोधक अनेक दशकांपासून प्रयत्न करत आहेत. आता, एक मोठी प्रगती एक महत्त्वपूर्ण वळणावर पोहोचली आहे.

हायब्रीड पिके कशामुळे महत्त्वाची आहेत?- संकरित पिके दोन अनुवांशिकदृष्ट्या भिन्न मूळ वनस्पतींना ओलांडून तयार केली जातात. पहिली पिढी (ज्याला F१ हायब्रीड म्हणतात) अनेकदा "हायब्रिड जोम" असते. याचा अर्थ, उच्च उत्पन्न, मजबूत वाढ, उत्तम रोग प्रतिकारशक्ती, सुधारित ताण सहनशीलता इत्यादी असते. संकरित मकामुळे (कॉर्न) २०व्या शतकात जागतिक शेतीमध्ये क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांनी त्वरीत त्याचा अवलंब केल्यानं खूप म्हणजे अनेकदा २०-३०% किंवा त्याहून अधिक उत्पादन वाढले. गव्हाच्याबाबतीच शास्त्रज्ञांना तीच आशा होत. प्रत्यक्षात गहू हा त्यांच्यासाठी आव्हानात्मक ठरला.

कॉम्प्लेक्स जेनेटिक्स हे गव्हाच्या संशोधनात मुख्य आव्हान- गहू अनुवांशिकदृष्ट्या गुंतागुंतीचा आहे. आधुनिक ब्रेड व्हीटमध्ये (ट्रिटिकम एस्टिव्हम) गुणसूत्रांचे सहा संच असतात. त्याला वैज्ञानिकदृष्ट्या 'हेक्साप्लॉइड' म्हणतात. सोप्या भाषेत, गहू एका वनस्पतीमध्ये एकत्रित तीन समान असलेले, मात्र, थोडे वेगळे जीनोम (गुणसूत्रे) वाहून नेतो. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. अनेक जीन्स अनेक वाणांमध्ये अस्तित्वात आहेत. गुणधर्म कसे एकत्र होतील, हे सांगणं कठीण आहे. काही जनुके संपू शकतात किंवा इतरांना कमकुवत करू शकतात. गव्हासोबत काम करताना प्रजननकर्त्यांना याचाच सामना करावा लागला. तर, मक्यासारख्या सोप्या पिकांमध्ये, अनुवांशिक व्यवस्थापन करणं सोपं आहे. गव्हात, जटिलतेमुळे संकरित झाडे सातत्यपूर्ण कामगिरी करणार नाहीत, असा धोका निर्माण होतो.

गव्हातील स्व-परागकण हा आणखी एक अडथळा - मक्याच्या विपरीत, गहू नैसर्गिकरित्या स्व-परागकण करतो. त्याच्या फुलांची रचना सामान्यतः फूल उघडण्यापूर्वीच फलन होते, अशी रचना आहे. यामुळे क्रॉस-परागीकरण दुर्मिळ होते. संकरित गहू तयार करण्यासाठी, प्रजननकर्त्यांनी, मादी पालकांना परागकण (पुरुष वंध्यत्व) तयार करण्यापासून प्रतिबंधित करणं आवश्यक असते. निवडलेल्या पुरुष पालकांकडून परागकण त्याची सुपिकता आहे, याची खात्री करणे. फुलांच्या वेळेस अचूकपणे समक्रमित करणं आवश्यक आहे. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या कठीण आणि खर्चिक आहे. अगदी लहान चुकांमुळेही नॉन-हायब्रीड बियाणे येऊ शकतात.

अर्थशास्त्र समस्या- संकरित गव्हाच्या झाडांसाठी प्रति हेक्टर मोठ्या प्रमाणात बियाणे आवश्यक आहे. संकरित बियाणे उत्पादन महाग होते. उत्पन्नातून मिळणारा नफा अनेकदा माफक . (५-१५%) होतो. बियाण्यांच्या वाढीव किमतीचा फायदा आहे की नाही, याबाबत शेतकरी संभ्रावस्थेत असतो. त्यामुळे अनेक दशकांपासून संकरित गहू व्यावसायिक पातळीवर पोहोचू शकला नाही.

प्रजनन आणि स्थिरता समस्या- गव्हामध्ये सहा गुणसूत्र संच असल्यानं पुनरुत्पादनादरम्यान जोडणी पूर्णपणे संतुलित असणं आवश्यक आहे. जेव्हा प्रजननकर्ते दोन भिन्न गव्हाच्या रेषा ओलांडतात तेव्हा गुणसूत्र योग्यरित्या संरेखित करू शकत नाहीत. प्रजनन क्षमता कमी होऊ शकते, धान्य उत्पादन कमी होऊ शकते किंवा वातावरणात भिन्न असू शकते. संकरित प्रणाली यशस्वी होण्यासाठी, ती वेगवेगळ्या हवामानात आणि मातीत वर्षानुवर्षे स्थिर असणं आवश्यक आहे. ही स्थिरता सर्वात मोठ्या वैज्ञानिक अडथळ्यांपैकी एक आहे.

एक्स-टेरा हायब्रिड गहू - एक प्रगती- Syngenta ने २०२६ मध्ये घोषित केलं की, त्याचे संकरित गहू प्लॅटफॉर्म, X-TERRA, फ्रान्समध्ये अधिकृतपणे नोंदणीकृत झाले आहेत. ही युरोपमधील पहिल्या व्यावसायिक संकरित गहू प्रणालींपैकी एक आहे. कंपनी युनायटेड किंगडम आणि इतर युरोपियन देशांमध्ये विस्ताराची तयारी करत आहे.

**एक्स-टेरा -**

१. आधुनिक जीनोमिक साधने: आजचे ब्रीडर्स प्रगत DNA तंत्रज्ञान वापरून संपूर्ण गहू जीनोम स्कॅन करू शकतात. हे त्यांना महत्त्वाची जीन्स जलद ओळखण्यास, कोणते पालक चांगले एकत्र करतील याचा अंदाज लावू शकतात. तसेच चाचणी आणि प्रजनन कमी करू शकतात.

२. सुधारित पुरुष (male) वंध्यत्व प्रणाली: कार्यक्षम संकरित उत्पादनासाठी विश्वसनीय पुरुष वंध्यत्व प्रणाली आवश्यक आहे. Syngenta ने सुधारित प्रणाली विकसित केल्या आहेत. त्या स्वयं-परागण कमी करतात, संकरित बियाण्याची शुद्धता वाढवतात आणि उत्पादन कार्यक्षमता सुधारतात. त्यामुळे बियाणे उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते.

३. उत्पन्नाच्या स्थिरतेवर लक्ष केंद्रित करा: केवळ जास्तीत जास्त उत्पादनाऐवजी X-Terra संकरित ऋतूंमध्ये सातत्यपूर्ण उत्पन्न, मजबूत मुळांचा विकास, रोग प्रतिकारशक्ती आणि पर्यावरणीय ताणात टिकविण्यावर भर देण्यात येतो. हे हवामान बदलामुळे दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित पर्जन्यमान वाढत असताना महत्त्वाचं आहे.

हायब्रीड गहू खूप महत्त्वाचा - आजची जगभरातील स्थिती १९६०च्या दशकापेक्षा वेगळी आहे. हरितक्रांतीच्या काळात, विस्तारीत सिंचन आणि खतांचा वापर यांचा उत्पादन वाढविण्यात मोठा सहभाग राहिलेला आहे. आज जलस्रोत मर्यादित असताना खतांचा खर्च वाढला आहे. हवामानातील परिवर्तनशीलता वाढत आहे. तर दुसरीकडं शेतीयोग्य जमीन कमी होत आहे. अशा परिस्थितीत कृषी जैवतंत्रज्ञानानं आता शाश्वत आणि कार्यक्षम नफा मिळवून दिला पाहिजे. संकरित गव्हाचा वापर कार्यक्षमता सुधारणे, मूळ प्रणाली मजबूत करणे, ताण सहनशीलता वाढवणे आणि अप्रत्याशित हवामानात उत्पादन स्थिर करणे यासाठी फायदेशीर ठरू शकतो. ज्याप्रमाणे सुधारित गव्हाच्या जातींनी भारताला अनेक दशकांपूर्वी अन्न स्वयंपूर्णता प्राप्त करण्यास मदत केली होती, त्याचप्रमाणे नवीन प्रजनन तंत्रज्ञान जगाला भविष्यातील अन्नाची मागणी पूर्ण करण्यास मदत करू शकते.

**काय आहेत आणखी आव्हाने-** जरी X-Terra मोठ्या प्रगतीचे प्रतिनिधित्व करत असले तरी, खालीलपैकी काही प्रश्न अनुत्तरित आहेत.

संकरित गहू सर्वोत्तम पारंपरिक वाणांना सातत्यानं मागे टाकतील का?

बियाणे खर्च स्पर्धात्मक राहू शकतात?

जास्त उष्ण किंवा कोरड्या प्रदेशात संकरीत वाण कसे कार्य करतील?

संकरित प्रणाली आशिया आणि आफ्रिकेसह जागतिक स्तरावर मापन करू शकतात?

संकरित गहू ताबडतोब पारंपारिक वाण बदलू शकत नाहीत. परंतु, तो एक नवीन मार्ग उघडतो. तसेच उत्पादनाची स्थिरता सुधारू शकतो. लवचिकता वाढवू शकतो. जगातील सर्वात महत्त्वाच्या मुख्य पिकांपैकी एकाचे भविष्य सुरक्षित करण्यात मदत करू शकतो. हरित क्रांतीपासून ते जीनोमिक्स- सहाय्यित प्रजननापर्यंत, गव्हामधील बदल सुरूच आहेत. पुढील दशकांमध्ये मानव स्वतःला किती यशस्वीरित्या आहार देईल, हे वनस्पती विज्ञान ठरवेल.

**- आप्पा राव पोडीले**

# कळंबोली सर्कल उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर; सप्टेंबर अखेरपर्यंत महत्त्वाचा टप्पा पूर्ण होणार

## वाहतूक सुरळीत ठेवत कळंबोली सर्कलवरील उड्डाणपूल उभारणीला वेग, नियोजनबद्ध कामामुळे प्रकल्प अंतिम टप्प्याकडे

महाराष्ट्र जीत







**नवीन पनवेल प्रतिनिधी** : सायन पनवेल मार्गावरील कळंबोली सर्कल येथे सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाला वेग आला असून प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने पुढे सरकत आहे. या प्रकल्पातील विविध टप्पे वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. सध्या आर्म-३ विभागातील डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले असून उर्वरित भागातही काम जलदगतीने सुरू आहे. आर्म-५ आणि आर्म-६ या जंक्शनच्या (महत्त्वाच्या जोडणाऱ्या भागाच्या) कामाला प्राधान्य देण्यात आले आहे, कारण हा प्रकल्पातील 'क्रिटिकल स्पॅन' मानला जातो. अधिकाऱ्यांच्या मते, हा भाग सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

कामाच्या प्रगतीसोबत वाहतूक व्यवस्थापनालाही विशेष महत्त्व दिले जात आहे. कळंबोली परिसरात काही प्रमाणात वाहतूक कोंडी होत असली तरी रॅम्प आणि डायव्हर्जनचे काम सुरू असल्याने परिस्थिती नियंत्रणात आहे. पर्यायी मार्गांची योग्य आखणी केल्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास होत नाही, अशी माहिती प्रकल्पाचे मॅनेजर हेड ऋषिकेश कोरडे यांनी दिली. आर्म-३ साठी एमजीएम समोरील डायव्हर्जन मार्गाचे कामही ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकल्पाचे काम नियोजनानुसार आणि योग्य तांत्रिक पद्धतीने सुरू असल्याने येत्या काळात या उड्डाणपुलामुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उड्डाणपुलाचे बांधकाम विविध "आर्म्स"मध्ये (मार्ग/दिशा) विभागून केले जात आहे, ज्यामुळे प्रत्येक दिशेतील वाहतुकीचा ताण वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये हाताळता येतो. आर्म-३ या भागातील डेक स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. हा टप्पा पूर्ण होणे म्हणजे उड्डाणपुलाच्या मुख्य रचनेतील एक मोठी प्रगती मानली जाते. आर्म-५ आणि आर्म-६ या दोन्ही आर्म्सचा जंक्शन भाग अत्यंत महत्त्वाचा असून, तो "क्रिटिकल स्पॅन" म्हणून ओळखला जातो. या भागातील काम सध्या प्राधान्याने सुरू आहे.

तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीचा हा टप्पा असल्यामुळे येथे अधिक दक्षता घेतली जात आहे. अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, हा भाग सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण होऊ शकतो. काम सुरू असतानाही स्थानिक वाहतुकीवर कमीतकमी परिणाम होईल यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. कळंबोली परिसरात काही प्रमाणात वाहतूक कोंडी जाणवत असली तरी ती नियंत्रणात ठेवण्यात प्रशासनाला यश आले आहे. रॅम्पचे काम सध्या सुरू असून, ते पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची दिशा अधिक सुलभ होईल. डायव्हर्जन मार्गांची उभारणी टप्प्याटप्प्याने केली जात आहे, ज्यामुळे वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होत आहेत. विशेष म्हणजे, काम सुरू असतानाही "ट्रॅफिक अनडिस्टर्ब्ड" ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. आर्म-३ साठी आवश्यक डायव्हर्जन काम ३१ मेपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. उर्वरित आर्म्समधील संरचनात्मक काम (गर्डर, स्लॅब, सपोर्ट स्ट्रक्चर) टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. जंक्शन भाग पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण उड्डाणपुलाच्या जोडणीचे काम वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे. या उड्डाणपुलाच्या पूर्णत्वानंतर कळंबोली सर्कलवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे आज महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन

महाराष्ट्र जीत



**उलवा, प्रतिनिधी :** कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून बांधण्यात येत असलेल्या वातानुकूलित भव्य सभागृहाचे शनिवारी (ता. २३) सायंकाळी ५ वाजता आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शानदार उदघाटन होणार आहे. या सभागृहाचे संपूर्ण अत्याधुनिक नूतनीकरण यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सढळ हस्ते केलेल्या आर्थिक सहकार्याने होत आहे. या समारंभाला पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, बदलापूर नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, अंबरनाथ नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष सदानंद पाटील, प्रदीप पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित राहाणार आहेत. हा समारंभ हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील सामाजिक सभागृह नेरळ-बोपेले येथे होणार आहे.

# डायमेड क्लिनिकचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते उदघाटन!

महाराष्ट्र जीत



**उलवे, प्रतिनिधी :** खांदा कॉलनी येथील डायमेड क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते गुरुवारी (ता. २१) उदघाटन करण्यात आले. यावेळी डॉ. अनुजा हिंगमिरे-पाटील, डॉ. राहुल पाटील, एम. के. पाटील आणि पाटील कुटुंबीयांनी महेंद्रशेठ घरत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी डॉक्टरांना पुढील यशस्वी व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, मिलिंद मोटघरे, रवींद्र कोट्यान, देवेंद्र चौधरी, किरण पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.